**प्रेस नोट दि.११/०५/२०१९**

**लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**जेष्ठ नागरीक श्री.काळुराम मारूती शेरे यांना सायकल सपुर्द केले बाबत..**

लष्कर पोलीस स्टेशन अंकीत चारबावडी पोलीस चौकी येथे चौकी अधिकारी व दप्तरी पोउनि.कुलाळ, पो.ना.७२५ मुलाणी यांना जेष्ठ नागरीक नामे श्री.काळुराम मारूती शेरे,रा.शिंदे छत्री,वानवडी,पुणे यांनी चौकीस येवुन सांगितले की,मी माझ्या पत्नीसोबत वरील दिलेल्या पत्त्यावर रहावयास असुन सायकलवर पुण्यात कोंढवा,वानवडी,कॅम्प,औंध या भागात खाजगी जेवणाचे डबे कार्यालया पर्यंत पोहचविण्याचे काम करतो दोन दिवसापुर्वी माझी सायकल कॅम्प भागातुन चोरीस गेली आहे. त्यावेळी पोउनि.कुलाळ व पो.ना.मुलाणी यांनी सदर सायकलचा कॅम्प भागात शोध घेतला असता सायकल मिळुन आली नाही. सायकल सापडत नसल्याने श्री.शेरे यांच्या डबा वाटपाच्या कामकात व्यत्तय निर्माण होत असल्याने श्री.शेरे हे उदास झाले होते. त्यावेळी पोउनि. व पो.ना.मुलाणी व सामाजिक कार्यकर्ते विकास भांबुरे यांनी मिळुन स्वखर्चातुन श्री.शेरे यांना नवीन सायकल खरेदी करून दिली व शेरे यांचे नैराश्य दुर केले.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस उप निरीक्षक चंद्रकांत द.भोसले,पोलीस निरीक्षक,गुन्हे श्रीमती.माया देवरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि.गणेश कुलाळ, पो.ना.७२५ मुलाणी यांनी नवीन सायकल श्री.काळुराम मारूती शेरे यांना सुपुर्द केली.

